दै. लोकमत 27 डिसें. 2013



महाविद्यालयांत मार्गदर्शन : तरुणींसह महिला कर्मचाऱ्यांना निर्भयपणे तक्रारी करण्याचे आवाहन

# पोलिसांकडून 'स्टिंग ऑपरेशन'

कोल्हापूर : महाविद्यालयीन तरुणींसह महिलांची होणारी छेडछाड, चेन स्नॅचिंगचे वाढते प्रकार, या पार्श्वभूमीवर तरुणी व महिलांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी अप्पर पोलीस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह यांच्या नेतृत्वाखाली महिला पोलिसांनी आज (गुरुवार) शहरात सर्वत्र स्टिंग ऑपरेशन केले. यावेळी तरुणींसह महिला कर्मचाऱ्यांना निर्भयपणे तक्रारी करण्याचे आवाहन केले.

मध्यवर्ती बसस्थानक येथे महिला कंडक्टर व प्रवाशांची भेट घेऊन त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. कोणाकडून एस. टी. बसेसमध्ये त्रास होत असेल तर थेट पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी केले. सीपीआर रुग्णालय, शहाजी, कॉमर्स, गोखले, कमला कॉलेज, एम. एल. जी., पद्माराजे, प्रायव्हेट हायस्कूल, शिवाजी पुतळा, आदी ठिकाणी भेट देऊन येथील महाविद्यालयीन तरुणी, महिला कर्मचारी यांच्याशी त्यांनी संवाद साधला.

यावेळी तरुणींनी कॉलेजच्या प्रवेशद्वारासमोर, बसस्टॉपवर, बसमध्ये, तसेच चालत जाणाऱ्या मुलींचा काही तरुण दुचाकीवरुन पाठलाग करून अश्लील शेरेबाजी करतात, अशा तक्रारी केल्या. यावेळी आपण निर्भयपणे पोलिसांकडे तक्रार करा, अशा गैरकृत्यांना आळा घातला जाईल, असे आवाहन ज्योतिप्रिया सिंह यांनी केले.



महाविद्यालयीन तरुणींसह महिलांची होणारी छेडछाड, चेन स्नॅचिंगचे वाढते प्रकार, या पार्श्वभूमीवर गुरुवारी महाविद्यालयात जाऊन अप्पर पोलीस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह व पोलीस उपअधीक्षक वैशाली माने यांनी मार्गदर्शन केले. मार्गदर्शनाबद्दल विद्यार्थिनींनी त्यांचा सत्कार केला.

## सहभागी अधिकारी, कर्मचारी

- स्टिंग ऑपरेशनमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह, पोलीस उपअधीक्षक वैशाली माने, उपनिरीक्षक ज्योती डमाळे, प्रतिभा ठाकूर, छाया देवरे, कॉन्स्टेबल सुवर्णा यादव, सविता दाभाडे, सरस्वती माने, रुपाली भोये, संगीता जगताप, सुजाता सुतार, माधवी ठोंबरे, छाया मडिवाल, सविता पाटील, निर्मला जाधव, प्रतिभा अतिग्रे, जन्नत नगारजी, वर्षा चौगुले, राणी रानगे, आदींचा सहभाग होता.

महिला पोलिसांनी केलेल्या स्टिंग ऑपरेशनमुळे महाविद्यालयीन परिसरासह बसस्थानक, सीपीआर, आदी ठिकाणी मोठी दहशत निर्माण झाली. महाविद्यालयीन परिसरात नेहमी टोळक्यांची गर्दी असते; ती आज अचानक गायब झाली होती. त्यामुळे या स्टिंग ऑपरेशनचा चांगलाच प्रभाव पडल्याचे दिसून आले. सिंह यांच्या या मोहिमेमुळे पालकवर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे. (प्रतिनिधी)

Scanned by CamScanner